परवानगी वर्ष : २००४- २० ०५ /नुतणीकरण
माध्यम : मराठी
कायम विना अनुदान.

जा.क्र.माध्य-३/१४/प्रथम मान्यता/पुवि/२० ०६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक :- 18 MAY 2006

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे.

विषय :- प्रथम मान्यता...
शेठ रामधारी रामचंद्र आगरवाल माध्य. विद्या. भोसरी, पुणे.

संदर्भ :- १. आपले पत्र क्रं. शिक्षण/माध्य/ह-४/प्र.मा/६७/०६ दि. २०. ३. २. ०६

२. शा.प.क्रं.नमाशा-१००३/[६९०/०३] माशि-१ दि. १६. १०. ०३.

३. कार्यालयाचे पत्र क्रं माध्य-३/१४/नमाशा/मान्यता/पुवि/०५/१८१०१/०४ दि. १४/९/२००५.

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये राष्ट्रप्रेम तरुण मंडळ, भोसरी, पुणे संस्थेच्या शेठ रामधारी रामचंद्र आगरवाल माध्य. विद्या. भोसरी, पुणे माध्यमिक शाळेच्या इयत्ता आठवी च्या वर्गास २००४ - २००५ या शैक्षणिक वर्षासाठी जून २०० ४ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्तता अधिन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करुना घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे १ यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावेत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७. सोबतच्या त्रूटींची पूर्तता करण्याच्या अटीवरच सदरची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

मूळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे -१ करीता

प्रत - १. मुख्याध्यापक, शेठ रामधारी रामचंद्र आगरवाल. माध्य. विद्यालय. भोसरी, पुणे.
२. निवड नस्ती

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण [माध्यमिक] विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/२२७/
नै.वाढ/०६.
पुणे. दिनांक : २५/७/२००६.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
~~शेठ रामधारी रामचंद्र आगरवाल माध्य.विद्यालय,~~
~~भोसरी, पुणे-३९~~

विषय : नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.२००५-०६
===== ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, इ.९ वी, ~~इ.१० वी~~.

आपल्या राष्ट्रप्रेम तरुण मंडळ या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित ~~शेठ रामधारी रामचंद्र आगरवाल मा.वि.भोसरी~~ माध्यमिक विद्यालयास इ.८ वी/~~इ.५ वी~~.चा वर्ग सुरु करणेस सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षापासून मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/१७७०९/०४, दि. ९/५/२००५ अन्वये शासनाची नूतनीकरणाने परवानगी मिळालेली आहे. सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, इ.९ वी, ~~इ.१० वी~~ चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००५ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी ~~आपण~~ सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे/~~गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती~~ यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

~~ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ.१० वी. चा वर्ग सुरु होत आहे, अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा.विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे ४१० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.~~

~~त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घेणेत यावी.~~

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) [माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणे करिता.
करिता.

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण [माध्यमिक] विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ई-४/२२७/
नै.वाढ/०६.
पुणे. दिनांक : २५/७/२००६.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
~~शेठ रामधारी रामचंद्र अगरवाल माध्य.विद्यालय,~~
~~भोसरी, पुणे-३९.~~

विषय : नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.२००६-०७
===== ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, ~~इ.९ वी~~, इ.१० वी.

आपल्या --------- ~~राष्ट्रप्रेम तरुण मंडळ~~ ---------------------
या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित ~~शेठ रामधारी रामचंद्र अगरवाल मा.वि.भोसरी~~
माध्यमिक विद्यालयास इ.८ वी/~~इ.५~~ वी.चा वर्ग सुरु करणेस सन २००४-०५
या शैक्षणिक वर्षापासून मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील
आदेश क्र.माध्य/३[१४२]/नमाशा/मान्यता/पुवि/१८९०१/०४, दि. ९ मे २००५
अन्वये शासनाची (स्वयंअर्थसहाय्यित? illegible insertion: स्वंतत्रीकरणाने) परवानगी मिळालेली आहे. सन २००६-२००७ या शैक्षणिक
वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, ~~इ.९ वी~~, इ.१० वी चा
वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००६ पासून नैसर्गिक वाढीने
परवानगी देणेत येत आहे. तरी ~~आपण~~ सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन
घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे/~~गट~~
~~शिक्षणाधिकारी~~, पंचायत ~~समिती~~ यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची
वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर
करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ.१० वी. चा
वर्ग सुरु होत आहे, अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा.विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय
मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता
वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार
राहणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणे करिता.